RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक २०(२)] बुधवार, जुलै २३, २०२५/श्रावण १, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ९३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **१८ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम **११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LXXXIV OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८४.**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ५.

**ज्याअर्थी,** यापुढे दिलेल्या प्रयोजनासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे.

**त्याअर्थी** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे.

**१.** (१) या अधिनियमास महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव प्रारंभ व व्याप्ती.

(२) तो, महाराष्ट्र शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास लागू होईल.

(३) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू राहील.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ५ यांच्या कलम १५७ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम १५७ मधील पोट-कलम (१) मध्ये, खंड (इ) नंतर पुढील खंड नव्याने समाविष्ट करण्यात येईल :—

"(इ-अ) आरोग्यविषयक व इतर सुविधा पुरविण्यासाठी १ कोटींच्या वर भांडवल असलेल्या उद्योगांकडून वार्षिक फी."

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ याच्या कलम १५७ अन्वये जिल्हा परिषदेस कर तसेच फी लादण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

सद्यःस्थितीत ग्रामीण भागात मोठ-मोठे उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावर उभारले जात असल्याने तेथील जवळपासच्या परिसरात वायू, जल व ध्वनीप्रदुषण मोठ्या प्रमाणावर होते. परिणामी तेथील वस्तीत राहणाऱ्या नागरिकांना छाती, घसा व डोळ्याचे विकार संभवतात व त्यांच्या आरोग्यास नाहक धोका निर्माण होतो. शिवाय, त्यांना औषधोपचारावर बराच खर्च करावा लागतो. शासनाकडून त्या भागात उपलब्ध असलेल्या आरोग्यविषयक सुविधा निधीअभावी अपुऱ्या पडतात. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील नागरिकांना पुरेशा आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषदेकडे आवश्यक निधी उपलब्ध व्हावा यादृष्टीने एक कोटीच्या वर भांडवल असलेल्या उद्योगांकडून जिल्हा परिषदेने एक रकमी वार्षिक फी घेण्याची तरतूद प्रस्तुत अधिनियमात करणे आवश्यक झाले आहे.

अशी सुधारणा करणे आवश्यक आहे. म्हणून हे सुधारणा विधेयक मांडण्यात येत आहे.

**विधान भवन :**<br>मुंबई,<br>दिनांक १४ जुलै, २०२५.

**ॲड. राहुल सुभाष कुल,**<br>प्रभारी सदस्य.

**वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन.**

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे.

**खंड १ (२) –** या खंडाव्दारे, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशा दिनांकास हा अधिनियम अंमलात आणण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वरील प्रस्ताव सामान्य स्वरूपाचा आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १८ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१.
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.